महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका २०१७
निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्याबाबत..

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.१६ /का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २६ /१२/२०१६

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)

विषय:- <u>महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०१७</u>
निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नेमणुकीबाबत...

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१६/का-५ दि १२.३.२०१५
२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१६/का-५ दि २६.१२.२०१६

महोदय,

आपल्याला ज्ञात आहे की, राज्यातील १० महानगरपालिका, २६ जिल्हा परिषदा व २९६ पंचायत समित्यांच्या मुदती मार्च-एप्रिल, २०१७ मध्ये संपत असल्यामुळे तत्पूर्वी त्यांच्या सार्वत्रिक निवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे. यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार प्रभाग रचनेची कार्यवाही पूर्ण झालेली असून विधानसभा मतदार यादी महानगरपालिका प्रभागनिहाय विभाजनाची कार्यवाही सुरु आहे.

२. महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी राज्य निवडणुक आयोगाच्या संदर्भाधीन आदेशानुसार नेमणे आवश्यक आहे.

३. एखाद्या जिल्हयामध्ये जर निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी उप जिल्हाधिकारी व तहसिलदार संवर्गातील अधिकारी आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध नसतील तर संबंधित महसूल विभागातील इतर जिल्ह्यांमधून आवश्यक अधिकारी उपलब्ध करुन देण्याबाबत विभागीय आयुक्तांनी कार्यवाही करावी. त्यानंतरही आवश्यक संख्येने अधिकारी उपलब्ध न झाल्यास इतर महानगरपालिकांतील उपायुक्तांना निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमता येतील यासाठी विभागीय आयुक्त यांनी संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांच्याशी चर्चा करुन उप जिल्हाधिकारी यांची

विभागातील आवश्यकता व उपलब्धता याचा आढावा घ्यावा व वरील प्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नेमणेकामी योग्य ते अधिकारी उपलब्ध करुन द्यावेत.

४. निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नेमताना खालील सिध्दांतांचे कटाक्षाने पालन करावे.

(अ) तो अधिकारी त्या जिल्ह्याचा स्थानिक रहिवासी (Home District)नसावा.

(ब) तो मागील ३ वर्षापासून एकाच पदावर कार्यरत नसावा तसेच तो संबंधित जिल्हयात मागील ४ वर्षपेक्षा जास्त कालावधीपासून नियुक्त नसावा.

५. निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नेमताना विभागीय आयुक्त यांनी खालील बाबींची खात्री करावी :-

(i) अधिकारी उत्कृष्ट, संशयातित सचोटी व नि:पक्षपातीपणे काम करणारे असावेत. त्यांचा कोणत्याही राजकीय पक्षाबरोबर संबंध नाही याबाबतची खात्री करावी.

(ii) सदर अधिकाऱ्यांना योग्य व पुरेसे प्रशिक्षण द्यावे.

६. निवडणूककामी महानगरपालिका आयुक्तांना उप जिल्हाधिकारी /उपायुक्त व तहसिलदार संवर्गातील अधिकारी उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी विभागीय आयुक्त यांची राहील. मात्र त्यांच्या नेमणुकीचे आदेश संबंधित महानगरपालिका आयुक्त काढतील.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत :-

१. आयुक्त बृहन्मुबंई,ठाणे,उल्हासनगर,पुणे,पिंपरी-चिचंवड,सोलापूर,नाशिक,अकोला,अमरावती, व नागपूर महानगरपालिका
२. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी/सर्व कार्यासने
३. मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक
४. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
५. निवड नस्ती